## नवी मुंबई पोलीस शिपाई भरती सन 2024-2025 च्या अंतिम निवडसुचीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना सुचना

पोलीस प्रशिक्षण केंद्रात मुलभूत प्रशिक्षणाकरीता उपलब्ध झालेल्या जागांनुसार उमेदवारांना गुणवत्ते प्रमाणे पोलीस शिपाई पदातील नियुक्ती करीता बोलविण्यात आलेले आहे. जे उमेदवार समांतर आरक्षणाचा लाभ घेवून (उदा. भुकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, खेळाडू, होमगार्ड, अनाथ, अंशकालीन पदवीधर, पोलीस पाल्य इत्यादी) नियुक्तीस पात्र ठरले आहेत अशा उमेदवारांनी सादर केलेल्या समांतर आरक्षणाच्या प्रमाणपत्राची पडताळणी संबंधित कार्यालयाकडुन करण्याची कार्यवाही सुरु आहे. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कडुन प्राप्त सुचनांनुसार, समांतर आरक्षणाच्या प्रमाणपत्राचा पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही या कार्यालयाकडून करण्यात येईल. तसेच समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर उमेदवार यांना लवकरच नियुक्ती आदेश देण्यात येतील.

## नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी व पोलीस मुख्यालय नवी मुंबई येथे हजर होण्यासाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांसाठी सुचना.

१. नमुद उमेदवार यांनी दिनांक.२५-०६-२०२६ रोजी सकाळी ०८.०० वाजता पोलीस मुख्यालय, रोडपाली, कळंबोली , नवी मुंबई येथे न चुकता हजर रहावे.

२. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मेस ॲडव्हांस भरणे आवश्यक असल्याने येताना सोबत पुरेशी रक्कम आणावी.

३. हजर होणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेले साहित्य उदा.गरजेनुसार आवश्यक असलेले वापरावयाचे कपडे, इतर साहित्य, बाड-बिस्तारा, जेवणासाठी ताट, वाटी, तांब्या तसेच बादली, मग वैगेर साहित्य बरोबर आणावे.

४. बँक खाते, डीसीपीएस/एनपीएस खाते व सेवापट उघडणेसाठी ३०X३० एमएम या साईजचे स्वत:चे ६ फोटो, मुळ पॅन कार्ड व आधार कार्ड सोबत आणावे.

५. ज्या उमेदवारांचे राष्ट्रीयकृत, मल्टीनॅशनल बँकेत खाते आहे, त्यांनी सदर बॅक खात्याचे पासबुक सोबत आणावे.

ठिकाण :- नवी मुंबई

दिनांक :- 23 /06/2026

पोलीस आयुक्त
नवी मुंबई

पोलीस भरती निवड मंडळ
यांचे मान्यतेने